पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०५

**सभावृत्तांत**

**दिनांक – २८/०१/२०२१** **वेळ – सकाळी ११.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक **२८/०१/२०२१** रोजी सकाळी **११.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते.

१. **मा.उत्तम प्रकाश केंदळे - सभापती**
२. मा.अश्विनी संतोष जाधव
३. मा.तुषार रघुनाथ हिंगे
४. मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे
५. मा.डब्बू आसवानी(हिरानंद)
६. मा.अपर्णा निलेश डोके
७. मा.भालेकर प्रविण महादेव
८. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.खोत- उप आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.पानसरे- क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.४) प्रभाग क्र.९ मासुळकर कॉलनी येथील डॉ हेडगेवार क्रीडा संकुल मधील स्केटिंग ग्राऊंड ११ महिने भाडे तत्वावर चालविणेबाबत.- मा.अपर्णा डोके, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव

विषय क्र.५) भोसरी जलतरण तलाव व्यायामशाळा ११ महिने कराराने चालविणेस देणेबाबत.- मा.अपर्णा डोके, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

-----------------

ठराव क्रमांक – १८ विषय क्रमांक – ०१
दिनांक –२८/०१/२०२१ विभाग - क्रीडा
सुचक – मा.शैलेश मोरे अनुमोदक – मा.अश्विनी जाधव
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/९/कावि/४/२०२१ दि.०७/०१/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा विभागांतर्गत ८ क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत येणा-या सर्व क्रीडा सुविधेच्या ठिकाणी नागरिकांना बसणेकामी पब्लिक प्लेस सिटींग चेअर्स(बेंचस) खरेदी करणेकामी बाजारातून प्राप्त झालेल्या अंदाजे दरांनुसार तसेच क्रीडा विभागाकडून प्राप्त झालेल्या बेंचेसच्या संख्येनुसार एकूण ८०० नग पब्लिक प्लेस सिटींग चेअर्स(बेंचेस) खरेदी करणेकामी अंजदो र.रु.१,६८,००,०००/-(अक्षरी र.रु.एक कोटी अड्डसष्ठ लाख फक्त) इतका खर्च येणार आहे. तरी सदरची खरेदी ही मध्यवर्ती भांडार

विभागाकडून जेम पोर्टल द्वारे खरेदी करणेकामी व सदरचा खर्च क्रीडा विभागाकडील " क्रीडा विभाग अंतर्गत नाविण्यपूर्ण, सुविधा, उपक्रम राबविणेबाबत " या तरतूदीमधून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – १९ विषय क्रमांक – ०२

दिनांक –२८/०१/२०२१ विभाग - क्रीडा

सुचक – मा.शैलेश मोरे अनुमोदक – मा.तुषार हिंगे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.क्रीडा/९/कावि/२१/२०२१ दि.२०/०१/२०२१

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा विभागांतर्गत भवानी तालीम येथे मा.सभापती क्रीडा समिती व मा.सभापती,स्थायी समिती यांचे मागणीद्वारे अद्ययावत स्वरुपाचे कुस्तीचे मॅट बसविणे आवश्यक असल्याने प्राप्त लघुत्तम दरांनुसार सदरचे कुस्तीचे मॅट बसविणेकामी अंदाजे र.रु.५,७५,०००/-(अक्षरी र.रु.पाच लाख पंचेहत्तर हजार फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे. तरी भवानी तालीम येथे अद्ययावत कुस्ती मॅट बसविणेकामी अंदाजे र.रु.५,७५,०००/-(अक्षरी र.रु.पाच लाख पंचेहत्तर हजार फक्त) च्या खर्चास व सदरची खरेदी ही मध्यवर्ती भांडार विभागाकडून जेम पोर्टलद्वारे खरेदी करणेकामी तसेच सदरचा खर्च क्रीडा विभागाकडील "क्रीडा व्यायाम साहित्य खरेदी" या तरतूदीमधून करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – २० विषय क्रमांक – ०३

दिनांक –२८/०१/२०२१ विभाग - क्रीडा

सुचक – मा.तुषार हिंगे अनुमोदक – मा.शैलेश मोरे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/९/कावि/२०/२०२१ दि.२१/०१/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाअंतर्गत मनपाचे आठ क्षेत्रीय कार्यालयामधील विविध ठिकाणी मा.नगरसदस्य यांचे मागणीनुसार एकूण ११६ ठिकाणी ओपन जिमचे व ३६ ठिकाणी इनडोअर जिम साहित्य खरेदी करिता एकूण अंदाजे र.रु.२१.५०,००,०००/-(अक्षरी र.रु.एकवीस कोटी पन्नास लाख फक्त) इतका खर्च येणार आहे. "क्रीडा व्यायाम साहित्य खरेदी" या लेखाशिर्षातून सदरचा खर्च करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीसभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – २१ विषय क्रमांक – ०४

दिनांक – २८/०१/२०२१

सुचक – मा.अपर्णा डोके अनुमोदक – मा.रेखा दर्शले

संदर्भ – मा.अपर्णा डोके, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.९ मासुळकर कॉलनी येथील डॉ हेडगेवार क्रीडा संकुल मधील स्केटिंग ग्राऊंड Be the Change या सार्वजनिक संस्थेला ११ महिने भाडे कराराने चालविण्यास देणेस मान्यता घेणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – २२ विषय क्रमांक – ०५

दिनांक – २८/०१/२०२१

सुचक – मा.अपर्णा डोके अनुमोदक – मा.रेखा दर्शले

संदर्भ – मा.अपर्णा डोके, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड शहरातील भोसरी जलतरण तलाव व्यायामशाळा ही मैत्री समाज विकास संस्था भोसरी व पिंपरी कॅम्प व्यायामशाळा ही सुपर मित्र मंडळ पिंपरी यांना ११ महिने सेवा शुल्क तत्वावर कराराने व्यायामशाळा रक्कम रुपये २०००/-(अक्षरी र.रु.दोन हजार फक्त) महापालिकेकडून घेवून चालविणेस देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृतांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( उत्तम प्रकाश केंदळे )**
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४२/२०२१
दिनांक : ०१/०२/२०२१

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.